प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

मे 30, 2016

**दि चौंडेश्वरी सहकारी बँक लि., इचलकरंजी, कोल्हापुर ह्यांना दिलेल्या निदेशांना आरबीआयकडून नोव्हेंबर 30, 2016 पर्यंत मुदतवाढ**

दि चौंडेश्वरी सहकारी बँक लि., इचलकरंजी, कोल्हापुर ह्यांना, ऑगस्ट 28, 2014 च्या निदेशांन्वये, ऑगस्ट 30, 2014 रोजी व्यवहार बंद झाल्यापासून सहा महिन्यांसाठी निदेशांखाली ठेवण्यात आले होते.

आमचा आदेश दि. फेब्रुवारी 5, 2015 अन्वये, ह्या निदेशांची वैधता, मार्च 1, 2015 ते जुलै 31, 2015 अशी सहा महिन्यांसाठी, सप्टेंबर 1, 2015 पासून ते नोव्हेंबर 23, 2015 अशी तीन महिन्यांसाठी आणि डिसेंबर 1, 2015 पासून सहा महिन्यांसाठी वाढविण्यात आली होती. जनतेच्या माहितीसाठी येथे अधिसूचित करण्यात येते की, निदेश दि. फेब्रुवारी 5, 2015, निदेश दि. जुलै 31, 2015 व निदेश दि. नोव्हेंबर 26, 2015 सह वाचित, निदेश दि. ऑगस्ट 28, 2014 चा कार्यकारी काल, आमचा सुधारित निदेश दि. मे 26, 2016 अन्वये, पुनरावलोकनाच्या अटीवर, जून 1, 2016 ते नोव्हेंबर 30, 2016 अशा सहा महिन्यांसाठी वाढविण्यात आला आहे. संदर्भित निदेशाच्या इतर अटी - शर्तींमध्ये कोणताही बदल नाही. मे 26, 2016 च्या निदेशाची एक प्रत जनतेच्या माहितीसाठी वरील बँकेच्या कार्यालयात प्रदर्शित करण्यात आली आहे.

भारतीय रिझर्व बँकेने निदेश सुधारित केले ह्याचा अर्थ, वरील बँकेच्या आर्थिक स्थितीत लक्षणीय सुधारणा झाल्याबाबत रिझर्व बँकेचे समाधान झाले आहे असा लावला जाऊ नये.

**अजित प्रसाद**

**वृत्तपत्र निवेदन : 2015-2016/2776** सहाय्यक सल्लागार